बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. १४५

# नोटीस

दि.१८/०२/२०२०

## महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशीप/ईबीसी/अंपग शिष्यवृत्ती/ अल्पंसख्यांक शिष्यवृत्ती २०१९-२० इ. योजनेच्या लाभाकरिता अर्ज भरणेकरिता शासनातर्फे जाहीर झालेल्या दि.२९ फेब्रुवारी,२०२० पर्यंत मुदतवाढीबाबत.

SC/ST/SBC/VJ/DT/NT/OBC/ Open- EBC/ESBC/Open-EWS या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी शासनाने जाहीर केलेल्या धोरणानुसार/निर्णयानुसार बी.टेक, एमसीए व एम.ई अभ्यासक्रमातील फक्त एससी प्रवर्गासाठी लागू योजना, या अभ्यासक्रमाकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये फी माफी घेऊन नवीन/नियमित प्रवेश घेतलेला आहे परंतु अद्यापही महाडीबीटी पोर्टवरून ऑनलाईन अर्ज भरलेला नाही अथवा काही कागदपत्रांअभावी पूर्ण फी भरलेली आहे व आता कागदपत्रांची पूर्तता झालेली आहे परंतु ऑनलाईन अर्ज सादर करू शकलेले नव्हते इत्यादी सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की,

१) शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता SC/ST/SBC/VJ/DT/NT/OBC स्कॉलरशिप/फ्रिशीप/ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (ईबीसी)/ अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती/अपंग शिष्यवृत्ती / पंजाबराव देखमुख निर्वाहभत्ता योजना २०१९-२० इ. योजनेच्या लाभाकरिता ऑनलाईन अर्ज भरण्याची साठी अंतिम मुदतवाढ **दि. २९ फेब्रुवारी, २०२०** पर्यंत दिलेली आहे. त्याअनुषंगाने जे विद्यार्थी वरील योजनेच्या सवलतीपैकी पात्र आहेत परंतु ज्यांनी अद्यापही आपला ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टल अर्ज भरलेला नाही त्यांनी त्वरीत अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

२) तसेच ऑनलाईन अर्जाच्या स्क्रुटीनीसाठी प्रत्यक्षात उपस्थित राहावे जेणेकरून विद्यार्थ्यांचा अर्ज त्वरीत शासनाकडे Forward करणे महाविद्यालयाला शक्य होईल व त्यांनतर त्या अर्जाची कॉपी व इतर कागदपत्रे महाविद्यालयात जमा करावेत. दिलेल्या मुदतीत जे विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरत/भरणार नाहीत अशा विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयाच्या खात्यामध्ये होत नाही. परिणामी अशा परिस्थितीत विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची संपूर्ण फी (शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क अथवा विकास निधी इ. शुल्क) भरणे अनिवार्य राहील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३) वरील मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत शासनाकडून आणखी मुदतवाढ जाहीर होणार नाही त्यामुळे विद्यार्थ्यांनी विनाविलंब ऑनलाईन अर्ज भरून घ्यावेत.

४) विद्यार्थ्याचे लॉगीनवरून शासनाच्या संबंधित विभागाकडून अथवा महाविद्यालयाकडून अर्ज मंजूर झाला आहे की नाही हे पाहण्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थ्याची आहे. काही वेळेस विद्यार्थ्याला काही कागदपत्रे अपलोड करण्यास शासनाकडून/महाविद्यालयाकडून कळविलेले असते परंतु विद्यार्थी ऑनलाईन अर्जाची स्थिती (Status) पाहत नसल्याने अर्ज विद्यार्थ्याचे लॉगीनवरच प्रलंबित राहतो व सदर अर्ज शासनाकडे मुदतीत सादर न केल्यामुळे विद्यार्थ्याचे त्यामुळे आर्थिक नुकसान होऊ शकते म्हणून विद्यार्थ्याने लॉगीनव्दारा अर्जाची स्थिती पाहणे अत्यंत गरजेचे आहे.

५) या वर्षी ज्या विद्यार्थ्यांनी उत्पन्न दाखल्याअभावी संपूर्ण फी भरून प्रवेश घेतलेला आहे परंतु मागील वर्षी सवलत मंजूर झालेली आहे अशा विद्यार्थ्यांनी देखील मागील वर्षाचा उत्पन्न दाखला जोडून ऑनलाईन अर्ज भरून सादर करावेत.

६) कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्याचा अर्ज शासनाने नामंजूर केल्यास अथवा विद्यार्थ्यांच्या लॉगीनवरच अर्ज प्रलंबित राहिल्यास विद्यार्थ्याला महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० चे संपूर्ण भरण्याची जबाबदारी विद्यार्थ्याचीच राहील.

७) विद्यार्थ्यांला शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण येत असल्यास त्वरीत महाविद्यालयातील विद्यार्थी विभागाशी संपर्क साधावा.

B. R. A. C. TRUST विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे-३७. VISHWAKARMA INSTITUTE OF TECHNOLOGY

**प्रबंधक**
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे-३७

प्रत :
१) मा. संचालक/प्रबंधक/लेखा विभाग प्रमुख यांना माहितीसाठी.
२) महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख यांच्या माहितीसाठी व विभागाच्या नोटीस बोर्डवर प्रकाशित करणेसाठी.
३) विद्यार्थी विभाग व इतर नोटीसबोर्डवर प्रकाशित करणेसाठी
४) सिस्टीम विभाग प्रमुख यांना महाविद्यालयाच्या www.vit.edu या संकेतस्थळावर प्रकाशित करणेकरिता.